॥ ५३११ ॥ नसे द्वेषाऐसें पाप । सत्या लोप झालिया ॥ १ ॥ पुण्य-उपकार घडे । यश जोडे पुराणीं ॥ २ ॥ जातो पतनासी वादी । पडे बंदीं यमाच्या ॥ ३ ॥ तुका म्हणे सांभाळावें । नाहीं जिवें वेंचलें ॥ ४ ॥

॥ ५३१२ ॥ बोल बोले अबोलणा । साक्षी मना करुनी ॥ १ ॥ नाम नित्य नेम कथा । श्री अनंता समर्पू ॥ २ ॥ तयाविणदुजा ठाव । नेणे देव दुसरा ॥ ३ ॥ तुका आवडिते अंस । ब्रह्मरस सेवनीं ॥ ४ ॥

॥ ५३१३ ॥ देतो देणें सद्गुरुचें । दुःख दूरकरी त्याचें ॥१॥ ऐसा निश्चय चित्ताचा । देव सद्गुरुचि साचा ॥ २ ॥ नाहीं दुसरें प्रमाण । जिवें अनुसरे प्राण ॥ ३ ॥ तुका ह्मणे इच्छादानी । गुरु दाता हा निर्वाणीं ॥ ४ ॥

॥ ५३१४ ॥ इच्छा ठेवी धनावरी । वर्ते अधर्म व्यवहारीं ॥ १ ॥ नाना सायास करिती । धन हव्यासें जोडिती ॥ २ ॥ जिवा न मानिती त्रास । करिती पर्वत मुगीस ॥ ३ ॥ तुका ह्मणे चाली । क्रोधें नको घाला घाली ॥४॥

॥ ५३१५ ॥ मनीं भाव नाहीं करी चळवळ । चित्तीं सदा मळ कपटाचा ॥ १ ॥ स्त्रियापुत्रादिक पाळी आवडीनें । जनासी निंदणें रात्रंदिन ॥ २ ॥ सज्जन सोईरे यांचे घातावरी । निंदी अहोरात्रीं संतजना ॥ ३ ॥ दया क्षमा शांती नाहींच सर्वथा । भाप देऊनि घाता करी सत्य ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसा जावो नर्ककुंडीं । कल्पवरी धाडी यम त्यासी ॥ ५ ॥

॥ ५३१६ ॥ ज्ञानियांचें कर्म ज्ञानियांचा धर्म । ज्ञानियांचें वर्म ज्ञानी जाणे॥१॥ज्ञानियांचा भाव ज्ञानियांचा देव । ज्ञानियांचा ठाव ज्ञानी जाणे ॥२॥ ज्ञानियांची कळा ज्ञानियांची लीळा । ज्ञानाचा सोहळा ज्ञानी जाणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पाहिजे यातीचे । येरां गबाळांचें काम नाहीं ॥ ४ ॥

॥ ५३१७ ॥ अंतरीं प्रपंच दृढ बळावला । नाहीं आठविला पांडुरंग ॥ १ ॥ स्वप्नामाजी नाहीं आठविलें नाम । नाहीं नित्य नेम याती धर्म॥२॥ नाहीं कधीं संतसंग समागम । केले परिश्रम जन्मवरी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं कुळाचार कांहीं । पर्वकाळ तोही ठावा नाहीं ॥ ४ ॥

॥ ५३१८ ॥ जाणोनी न करी शिकवितां पाही । असोनियां नाहीं संसारासी ॥ १ ॥ सारविले कष्ट श्रमेना अभागी । सांडुनियां वेगीं पळे दुरी ॥ २ ॥किती सांगों आतां वारंवार पुढां । वळें आणी पीडा दाटोनियां ॥३॥ दर्पणाचें रूप न पाहे नावेक । जया नाहीं नाक मुळींहुनी ॥ ४ ॥ तुका म्हणे पुढें बोढवली भीक । सांगतों विवेक न करितां ॥ ५ ॥

॥ ५३१९ ॥ कैसा पाहतां या काळें । मग न चलती बळें ॥ १ ॥ ऐसें ठावें नाहीं मुढें । सोस काकुलती पुढें ॥ २ ॥ माझीं नका जाळूं भांडीं । पोटीं सोस भय तोंडीं ॥ ३ ॥ काय संचित तें करी । नर्का जाय मेल्यावरी ॥४॥ पर उपकार । हाचि घडावा विचार ॥ ५ ॥ तुका ह्मणे काय लासी । आतां भेटों नये ऐसी ॥ ६ ॥

॥ ५३२० ॥ विटे करीतांही पाप । दुःखरूप साधिती ॥ १ ॥ परदारीं ठेवी चित्त । कोण हित ते ठायीं ॥ २ ॥ नाक कान हे शेवटीं । पडे गांठी दोहींसी । ३ ॥ तुका ह्मणे सांगों किती । हे फजिती दुर्दशा ॥ ४ ॥

॥ ५३२१ ॥ काय खावयाची आस । ओस पडे स्वहितास ॥१ ॥ कोंडें संसाराकडे । न पाहेचि मागें पुढें ॥ २ ॥ सदा तळमळी रांडा । घाली जिवानांवा धोंडा ॥ ३ ॥ तुका ह्मणे बरें झालें । वे घे बाईल वहिलें ॥ ४ ॥

॥ ५३२२ ॥ शिकविली कळा ह्मणुनियां दावी । अर्थीं दृष्टी लावी नेणे पुसों ॥१॥ दिसेभरी घोकी बहु केलें पाठ । अर्थाची सा भेट नव्हे कधीं ॥ २ ॥ तया वाचे राम येऊं पाहे कैंचा । विश्रामाचें कैंचा धाम पावे ॥ ३ ॥ शिकलें तें वाचे पढों जाणे निकें । न कळे वैदिकें ज्ञान कैसें ॥४ ॥ तुका ह्मणे जैसा शिकविला पुंसा ॥ लागल्या अभ्यासा बोलूं जाणे ॥ ५ ॥

॥ ५३२३ ॥ धनालागीं करी नाना व्यवसाय । दुःखी जीव होय राण भरी ॥ १ ॥ धनालागीं नीच सेवा सेवी निंद्य । वदती अवद्य वाणीयेसीं ॥ २ ॥ धनालागीं सत्य सुकृतें वेंचिती ॥ प्रतिग्रह घेती पाप लागे ॥ ३ ॥ धनालागीं नाना आचार ते दान । कुळबुडवण होत असे ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसी धनाची अपेक्षा । यमाची ते शिक्षा तयां माथां ॥ ५ ॥

॥ ५३२४ ॥ पुढिल्याचें दुःख देखतसें डोळां । बळेंचि आंधळा होत आहे ॥ १ ॥ न धरीच सोय मागील रहाटी । मनासवें कष्टी होत पुढें ॥ २ ॥ गोरा वाडी जाय सुना धुंडी बिदी । सांगितली बुद्धी नायकेचि ॥ ३ ॥ बळें फाडी गांड घाली धसावरी । मग चुरमुरी दुःख होतां ॥ ४ ॥ तुका ह्मणे ज्याची बुद्धी असे कुडी । हेत घडघडी शुद्ध कैंची ॥ ५ ॥

॥ ५३२५ ॥ गोहो आला घरा । दुःखें विवळे ती पोरां ॥ १ ॥ पोटीं शूळ मिळे पथ्या । वेडा पुसे काय व्यथा ॥ २ ॥ धाडा तांदुळ साखर । दुध अनेक घागर ॥ ३ ॥ चवी कधीं नाहीं मुखा । वेळा मिळे तें भुर-

का ॥ ४ ॥ गोडी नेदी कीं नारळ । हातें चोळी सोन केळ ॥ ५ ॥ भीडां आणुनी बांधला । तुका ह्मणे वेडा तिला ॥ ६ ॥

॥ ५३२६ ॥ पाषाण सुवर्ण भीमा जांबुनद । वंशाचा संबंध ब्रह्मयाच्या ॥ १ ॥ सुवर्णाची पुरी समुद्राचा वेढा । समुदाय गाढा राक्षसांचा ॥ २ ॥ चवदा चौकड्या आयुष्यगणणा । बंधू बिभीषण कुंभकर्ण ॥ ३ ॥ ऐशीं सहस्र ज्या सुंदर कामिनी । मुख्य पट्टराणी मंदोदरी ॥ ४ ॥ पुत्रपौत्रांचा लेखा कोण करी । देवां आणि हारी इंद्रजित ॥ ५ ॥ लंकेमाजि घरें किती तीं आइका । सांगतसें संख्या जैसी तैसी ॥ ६ ॥ पांच लक्ष घरें पाषाणाचीं जेथें । सात लक्ष तेथें विटबंदी ॥ ७ ॥ कोटी घरें तेथें काशा ही तांब्याचीं । शुद्ध कांचनाचीं शत कोटी ॥ ८ ॥ तुका ह्मणे ज्याची संपदा एवढी । सांगातें कवडी नेली नाहीं ॥ ९ ॥

॥ ५३२७ ॥ पंडित ते जन करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥ १ ॥ शिकविल्या बोला घालतील वाद । अनुभव भेद नाहीं कोणा ॥ २ ॥ तुका ह्मणे देती लांचासाठीं ग्वाही । देखिली ती नाहीं वस्तु ठायीं ॥ ३ ॥

॥ ५३२८ ॥ पर्जन्य पडला नदी पूर आला । भुजंग वाहावला लोटभारें ॥ १ ॥ खळाळीं पडला फार कष्टी झाला । मग तो बोलला काढी मज ॥ २ ॥ राजहंस पक्ष्यें चंचुनें धरिला । बाहेर काढिला भुजंग तो ॥ ३ ॥ सावध होवोनी घातलें वेटाळें । तत्काळ भक्षिलें पक्षियातें ॥ ४ ॥ असंगाचा संग पक्षासी घडला । प्राणासी मुकला तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ५३२९ ॥ कंटकाचे गांवीं साधूची वैरळी । सांपडली शेळी वृकां माजी ॥ १ ॥ कंटकाचे गांवीं अवघीच हाव । नारायण नांव नेघे कोणी ॥ २ ॥ मोतियांची गोणी माळ्या शेजारी । ह्मणती पांसेरी केवढ्याची ॥ ३ ॥ तुका ह्मणे शाख कडू भोंपळ्याची । केली नये रुची उपेगासी ॥ ४ ॥

॥ ५३३० ॥ तेजियाचे गुण युद्धा आंत घ्यावे । तया उपमावें खर कैसें ॥ १ ॥ काय सांगूं आतां सारिखी आकृती । आरबी न होती तट्ट ऐसे ॥ २ ॥ चिंतामणी गळां नांवाचा तुरंग । नये गुण भाग गर्दभासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तैसे भले आणि खळ । ते कैसे केवळ सरी होय ॥ ४ ॥

॥ ५३३१ ॥ इच्छा मनीं धनवंता । प्रयत्नता आटाटी ॥ १ ॥ बहु कष्टतां साधनें । कर्मपणें सापुडे ॥ २ ॥ रत्न शोधोनियां वांटा । शंख मोठा ह्मातासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे यत्न वृथा । कां संचिता रुसावें ॥ ४ ॥

॥ ५३३२ ॥ गाढवाचे गांवीं लाथांचा सुकाळ । भुंकोनी कोल्हाळ माजविला ॥ १ ॥ श्वानाचिये घरीं भुंकणें न राहे । स्वभावासी काय करावें त्या ॥ २ ॥ तैसा दुर्जनाचा पीडा करी संग । न साहवे भोग कोणासही ॥ ३ ॥ नानापरी पीडा देतां कंटाळेना । छळितां भिईना पाप बुद्धी ॥ ४ ॥ माळा टिळे टोपी उपचार भोग । करितां हें अंग पोळतसे ॥ ५ ॥ वरी पुष्प वृष्टी शास्त्राचियेपरी । साहिलें हें भारी न बोलेची ॥ ६ ॥ तुका ह्मणे भोग प्रारब्धाचे हातीं । मानिला हा चित्तीं धीर ऐसा ॥ ७ ॥

॥ ५३३३ ॥ न करी जाणतां सांगतां तें हित । आडमार्गें जात दाटोनियां ॥ १ ॥ कैसें न कळे हे अन्न खातां पाणी । न पिये तो प्राणी वांचे कैसा ॥ २ ॥ ग्रासोग्रासीं विष घेतां आवडीनें । वांचला हा कोण कोणेवेळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे रोग दिधल्या औषधी । पथ्याविण व्याधी जाय कैशी ॥ ४ ॥

॥ ५३३४ ॥ ज्यानें देव गडी केला । हातीं भोपळा लाधला ॥ १ ॥ जो कां देवाचा सांगाती । त्याची खायाची विपत्ती ॥ २ ॥ तुका ह्मणे भक्तिशीळ । आलें मरणासी मूळ ॥ ३ ॥

॥ ५३३५ ॥ नेणती तयांनीं सोडियेली वाट । पडलें अव्हाट काळचक्रीं ॥ १ ॥ तयां सोडविता नाहीं दुजा कोणी । आणिक निर्वाणीं देवाविण ॥ २ ॥ देवाविण नाहीं कोणासी आधार । रविविण थार नाहीं जैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया शरण ह्मणतां । कृपा दिनानाथा मग होय ॥ ४ ॥

॥ ५३३६ ॥ ज्याचे अंतरीं निर्धार । वदे कोमळ जिव्हार ॥ १ ॥ नाहीं द्वेष जया चित्ता । सर्वांभूतीं त्या समता ॥ २ ॥ सदा निर्मळ अंतर । शुद्ध सत्वाचें आगर ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणे ऐसें । तैसे विठोबासरिसे ॥ ४ ॥

॥ ५३३७ ॥ आणुनियां मनीं मानितो विश्वास । असो या सर्वांस उदासीन ॥ १ ॥ ठेविलें तुकानीं विश्वासी म्हणोनी । पाहिलिया मनीं एक निष्ठा ॥ २ ॥ सांगितलें तैसें पाळिलें वचन । तें प्रतिपादन शब्दाचिया ॥ ३ ॥

न्यूनाधिक जें न कळतां घडे । त्याचें त्यासी पडे सांभाळावें ॥ ४ ॥ मी तो काय येथें निमित्याचा वाणी । राखे पोतीं धणी ज्याचीं तोच ॥ ५ ॥ तुका म्हणे केलें निमित्याचें आड । देवाचें कैवाड देव जाणे ॥ ६ ॥

॥ ५३३८ ॥ नारायण नारायण । नाहीं ज्ञान याविण ॥ १ ॥ गोविंद गोविंद । भक्तिवाद मानिती ॥ २ ॥ हरीसखा हरीसखा । नाहीं धोका सकळां ॥ ३ ॥ तुका म्हणे साह्य देव । नाहीं भेव कदापि ॥ ४ ॥

॥ ५३३९ ॥ प्रपंचाचे संगें थोर झाली हानी । व्यासंगबंधनीं भूल पडे ॥ १ ॥ तेथें कोणालागीं सोडविना कोणी । जन्मोनीयां प्राणी नर्का जाय ॥ २ ॥ सहस्र विंचूंची एकचि वेदना । अंगोळिया प्राणा जातेवेळे ॥ ३ ॥ हात खोडी पाय विचकती दांत । ताठा भरे व्यस्त शरीर हें ॥४॥ देखोनियां जन भयाभीत मन । अंतरीं वेदना तोचि जाणे ॥ ५ ॥ कफ दाटे भारी गर्गरीत कंठ । यातना उत्कंठ होती जीवा ॥ ६ ॥ तुका म्हणे प्राण जातानां जाईना । यमाची यातना थोर आहे ॥ ७ ॥

॥ ५३४० ॥ हातीं आहे हित होईल तयासी । हाणी हृषिकेशी येऊं नेदी ॥ १ ॥ हिताचा सायास होतें न करिती । हातींचें सांडिती नवल हें ॥ २ ॥ होणारासी बुद्धि होत असे सोई । हेंचि पुढें राही वारी कोणा ॥३॥ होकां भलतेंसे होणार सारिखें । हाचि एक देखे आनंदातें ॥ ४ ॥ होय म्हणे तुका ऐसा कोणी प्राणी । ज्याचे ध्यानीमनीं पांडुरंग ॥ ५ ॥

॥ ५३४१ ॥ नामाचे पवाडे ऐकती श्रवण । अर्थी तें नमन वेधियेलें ॥ १ ॥ चित्ता होय सुख वेधि लागे हेत । वासना हे शांत ठायीं ठायीं ॥२॥ जिवा बोध झाला निर्वाळला आत्मा । उठावला प्रेमा आवडीचा ॥ ३ ॥ उपरती चित्ता झाली तृप्तीवरी । रोमांच शरीरीं दाटलासे ॥ ४ ॥ तुका म्हणे अंगीं आदळे अवस्था । यया नांव वक्ता श्रवणार्थी ॥ ५ ॥

॥ ५३४२ ॥ भक्ति तैसें फळ । असे सिद्धचि जवळ ॥ १ ॥ एक जाती ऐसेरंग । खूण दावी मिळे संग ॥ २ ॥ सूर्यबिंब शशीरश्मी । भिन्न नाहीं एका नामीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तें मोहरा । कळे अग्नीनें सामोरा ॥ ४ ॥

॥ ५३४३ ॥ नव्हे सांगितलें शिकविलें ज्ञान । आंगींचा हा गुण सहजचि ॥ १ ॥ राहतां न राहे दिल्हें होंचि सांडी । मागीलाची जोडी त्यागी सर्व ॥ २ ॥ निःशंक निर्भय स्फुरण सर्वांगीं । उदासीन जगीं देहभा-

वा॥३॥ गृहसुतावित्त कुळ श्रेष्ठ गोत । मागील वृत्तांत आठवोचि ॥ ४ ॥ तुका ह्मणे वेष शूरत्वाचे अंगीं । सतीचे विभागीं एक भाव ॥ ५ ॥

॥ ५३४४ ॥ कर्मरेखा क्रियमाण । हें तो ठायींचें चि जाण ॥ १ ॥ विधीनिषेधाची संधी । एका निवडेना मधी ॥ २ ॥ घडे त्यागावे ते संगं एक एकिचिया अंगें ॥ ३ ॥ होय तृष्णेचेनि दुःखें । केलें कासावीस सुखें ॥ ४ ॥ तुका ह्मणे करी । ऐसी कृपा निरंतरी ॥ ५ ॥

॥ ५३४५ ॥ अवघियां श्रेष्ठ साधनांचें सार । अवघा प्रेमभर विठोबाचा ॥ १ ॥ अवघीयां योग साधन सेवन । विठ्ठल निधान सेवा जोडे ॥ २ ॥ सर्व दान व्रतें उद्यापन नेम । विठोबाचें प्रेम नाम निष्ठा ॥ ३ ॥ सर्व तीर्थ क्षेत्रें केलीं यथासांग । जरी पांडुरंग साह्य होई ॥ ४ ॥ तुका म्हणे केलीं सत्कर्मे सकळ । हृदयीं गोपाळ वास करी ॥ ५ ॥

॥ ५३४६ ॥ बाळपणीं खेळे मातेसान्निधानें । श्लाघ्य वाटे मनें तेंचि घ्यावें ॥ १ ॥ कोणाही पदार्थीं भय नाहीं धाक । करितां ही शोक निदूं नये ॥ २ ॥ पुढें येत येतां कुमारत्व आलें । खेळासी गुंतले चित्त आधीं ॥ ३ ॥ नाइके सांगतां वडिलांची नीत । सदा हिंडे चित्त खेळासवें ॥ ४ ॥ गाडे घोडीं बैल हिंडोनी बैसोनी । नाचे उडे मनीं आलें तैसें ॥५॥ लोण पाट थाट लेंड हेंड भेंडी । सुरकांटी धोंडी धरी अंगें ॥ ६॥ पोंवा मोहरी ते कमरी लकुटा । लपणीची मूठ हाताहातीं ॥ ७ ॥ चिर घोडी बेंदू खत गोट्यासारी । बैसे पाठीवरी एकमेकां ॥ ८ ॥ कोणें सांगितल्या कोणाचें ही मना । नये अनुमाना शिकविलें ॥ ९ ॥ तुका ह्मणे गेलें पोरपण वृथा । तारुण्याची कथा थोर आहे ॥ १० ॥

॥ ५३४७ ॥ येउनी संसारीं विषयीं आसक्त । गुंडाळिलें सुत तांतणीनें ॥ १ ॥ तैसा चित्त हेत गुंतोनियां राहे । तया कैसा होय परमार्थ ॥ २ ॥ काय करावे ह्या माळा मुद्रा टिळे । वैष्णव केवळ कैसा होय ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी येथील पारखी । छंदाची सारिखी नव्हे ऐसी ॥ ४ ॥

॥ ५३४८ ॥ जन्म किती सोसी पुढें । हे बापुडे इच्छेचे ॥ १ ॥ वारंवार नरकीं पचे । पाय साचे यमाचे ॥ २ ॥ कितीवेळां तरी धका । खातां सांगा न सोडी ॥ ३ ॥ तुका संचित हिकुडे । आलें पुढें टाकोनी ॥ ४ ॥

॥ ५३४९ ॥धीर नव्हे मनें । काय तयापाशीं उणें ॥१॥ तार घातली-यावरी । दासां उपेक्षिल हरी ॥२॥ याचें ऐसी आटी । द्यावें द्रव्याचिये हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोटीं । देवा बहुकें खोटीं ॥ ४ ॥

॥ ५३५० ॥ नाम लक्षुमीचें धरी । शिरीं वाहे मोळिया ॥ १ ॥ कोण त्याचा थोरपणा । विटंबना नामाची ॥ २ ॥ धनपाल नामदीक्षा । परी भिक्षा मिळेना ॥ ३ ॥ श्रेष्ठ नाम अमराचें । गृह साचें यमाचें ॥ ४ ॥ तुका न वागवी खोटें । कर्म मोठें बलाढ्य ॥ ५ ॥

॥ ५३५१ ॥ हरिदासां सोपें वर्म । सर्व धर्म पाउलें ॥ १ ॥ देव कडिये घे खांदीं । क्रीडा मांडी वैष्णव ॥ २ ॥ सर्वकाळ आटाआटी । नाहीं लोटी लाभाची ॥ ३ ॥ तुका म्हणे समाधान । दास मन आमुचें ॥ ४ ॥

॥ ५३५२ ॥ साधु सज्जनासी सदा भेटों जाय । शठ वंदी पाय नम्रपणें ॥ १ ॥ ज्याचे गिवसुनी गुणदोष पाहे । दुर्विनीत राहे तयेठायीं ॥ २ ॥ तुका ह्मणे जाण सर्व ज्याचे भाव । देवा आदि देव पांडुरंग ॥ ३ ॥

॥ ५३५३ ॥ शिंपलियावरी जाळ । वांया जाय त्याचें मुळ ॥ १ ॥ ऐसा वारावा तो श्रम । नाहीं अतिशय काम ॥२॥ सांभाळावें वर्म । काळें उचिताचा धर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । ऐसा कारणाचे वेळे ॥ ४ ॥

॥ ५३५४ ॥ ऐसें बरें आलें मना । नारायणा या काळें॥१॥देव आह्मा प्राणसखा । झालें दुःखा खंडण ॥ २ ॥ जन्मांतरीं पुण्यराशी । फळ सासीं होईल ॥२ ॥ तुका ह्मणे निज ठेवा । त्यांत हेवा लाधल्या ॥ ४ ॥

॥ ५३५५ ॥ बोलविशी माझ्या मुखें । परि या जनां वाटे दुःख ॥१ ॥ जया जयाची आवडी । तें तें तया चरफडी॥२॥कठीण रे तो काढा । बळें रोगी मेळवी दाढा ॥ ३ ॥ खाऊं नये तें तें मागे । निवारितां रडूं लागे ॥ ४ ॥ पथ्य औषधाकारणें । नेदी जेवायासी अन्न ॥५॥ वैद्या भीड काय । अतिताई जिवें जाय ॥ ६ ॥ तुका ह्मणे यांत । आवडे ते करी मात ॥ ७ ॥

॥ ५३५६ ॥ काय देतील देणार । ध्यावा एक रघुवीर ॥ १ ॥ आज दिलें उद्यां नाहीं । ऐशापाशीं मागों कायी ॥ २ ॥ ऐसें मागों विठ्ठल धुरे । देतें कल्पांतीं न सरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे बा अनंता । तुजवरी माझी सत्ता ॥ ४ ॥

॥ ५३५७ ॥ विश्वातें पाळीतां नाहीं उबगला । आमुची तयाला चिंता काय ॥ १ ॥ पाषाणाचे पोटीं वहाती दर्दुर । त्यासी तूं साचार पुरविसी ॥ २ ॥ पक्षी अजगर करिती संचिता । त्यासी तूं अनंता पुरवीसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यावरी भार घातालिया । उपेक्षीना दयासिंधु मज ॥ ४ ॥

॥ ५३५८ ॥ हा तो नोहे कांहीं निराशेचा ठाव । भलें पोटीं वाव राखिलिया ॥ १ ॥ विश्वंभरें विश्व समाविलें पोटीं । तेथेंचि शेवटीं आह्मी असों ॥ २ ॥ नेणतां चिंतन करितों अंतरीं । तेथें अभ्यंतरीं उमटेल ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझा स्वामी अबोलणा । पुरवूं खुणे खूणा जाणतसे ॥ ४ ॥

॥ ५३५९ ॥ करी आतां जागें मज । ऐसें सांगतों मी तुज ॥ १ ॥ दोघे साह्य एकमेकां । होय गाऊनी हरि सखा ॥ २ ॥ नाम गोविंदाचें वाचे । घेतां मग दुःख कैचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें जेवीं । प्राण आवडतो तेवि ॥ ४ ॥

॥ ५३६० ॥ ज्याचें होतांची दर्शन । नुरे भान देहींचें ॥ १ ॥ समपदीं पडे मिठी । होय तुटी संसारा ॥ २ मान दंभ अहंकार । जाय दूर पळोनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे शुद्ध मन । हे चरण देखतां ॥ ४ ॥

॥ ५३६१ ॥ खोळंबा ती मग तातडीची धांव । अंगा आणी भाव निश्चयाचा ॥ १ ॥ ह्मणउनी बरी विचारावी चाली । उरे तेचि बोली कामा येती ॥ २ कोरडें वैराग्य मांजिर तें खरें । शूरत्व उतरे अंगींचें तें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नीट झऱ्याची ते चाली । सांठवण खोली कैसी याची ॥ ४ ॥

॥ ५३६२ ॥ प्रयाणाचे योगें वाटेवरी गंगा । जातां स्नान कांगा करूं नये ॥ १ ॥ तीर्थवासीं तेणें आलिया पर्वणी । आळसें करूनी साधूं नये ॥ २ ॥ क्षेत्रवास तया सहज असोन । देवाचें दर्शन घेऊं नये ॥ ३ ॥ तैसा विठोबाचा मुद्रांकित तुका । सांगे हिता तें कां ऐकूं नये ॥ ४ ॥

॥ ५३६३ ॥ क्षमा दया लोकां । अंतपार नाहीं लेखा ॥ १ ॥ घरोघरीं लक्ष्मीवास । आला दरिद्राचा त्रास ॥ २ ॥ नाहीं केलें जप तप । नरनारी सुखरूप ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृपा केली । देवें मग ओंवाळिली ॥ ४ ॥

॥ ५३६४ ॥ अंगीं नाहीं स्वतःशक्ती । कांहीं भक्ति वैराग्य ॥ १ ॥ तया कैसें घडे जाण । नाहीं मन हातीं तों ॥ २ ॥ शांती इंद्रियांची झाली सर्व मेली वासना ॥ ३ ॥ कैसा होय ब्रह्म तेणें । हिंडे मन सैराट ॥ ४ ॥ तुका ह्मणे मिराशीचें । शेत ज्याचें वाहेना ॥ ५ ॥

॥ ५३६५ ॥ दुर्जनाचा संग आगीचें तें झाड । अंगा येती फोड लागतांचि ॥ १ ॥ काय लाभ त्याचे शेजे बैसायाचा । वीट या देहाचा कां करावा ॥ २ ॥ गूळ टाकोनियां वृंदावन खावें । ऐसें कां करावें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ५३६६ ॥ उद्धरल्या जाती । द्रव्यें रंगल्या पद्धती ॥ १ ॥ बहु ह्मणवोनि फार । साचें असावें अंतर ॥ २ ॥ कैंची पाठी पोट । गोड विषासी शेवट ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोपा । नेणे कुरवाळिलें बापा ॥ ४ ॥

॥ ५३६७ ॥ जाणा वाण निवडिलें । ऐसें भलें वाईट ॥ १ ॥ सारासार भरे पोटीं । खरें हातीं घेतलें ॥ २ ॥ खरें खोटें वेळावेळ । हरीबळ जाणती ॥ ३ ॥ शुद्धाशुद्ध भाव नेणें । तुका ह्मणे मी एक ॥ ४ ॥

॥ ५३६८ ॥ पोटासाठीं लेकराची । प्रीत मानी समर्थाची ॥ १ ॥ दाट बळें संत निंदा । करी नाइकावें सदा ॥ २ ॥ पोटामध्यें पाळी कोण । पुढें अन्न देतें कोण ॥ ३ ॥ तुका ह्मणे पोट । भाग्यवंता घरीं भाट ॥ ४ ॥

॥ ५३६९ ॥ आलिया याचका ह्मणतां हो पुढें । आपुलें रोकडें सत्व जातें ॥ १ ॥ काय कामभार घेऊनि मस्तकीं । हीनकर्मी लोकीं ह्मणावया ॥ २ ॥ दारीं हाक कैसें करावें भोजन । रुची तरी अन्न कैसें देतें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ध्वज उभारिला कर । ती शक्ति उदार काय झाली ॥ ४ ॥

॥ ५३७० ॥ करावा संकोच आपणा भोंवता । होय तें बहुतां सुख किजे ॥ १ ॥ देवाची ते पुजा भुतांचें पाळण । मत्सर तो शीण बहुतांचा ॥ २ ॥ रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरी सकळही ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतपण याचि नांवें । जरी होय जीव सकळांचा ॥ ४ ॥

॥ ५३७१ ॥ पुत्र व्हावा ऐसा श्रावणासारिखा । मायबाप देखा नेत होता ॥ १ ॥ नेत होता फुलें रोहिदास बाळ । डंकियेलें काळें करिल काय ॥ २ ॥ न करी मर्यादा चिलयातो बाळ । भोजनाचें बळ मांडियलें ॥ ३ ॥ मांडिलें संकट रुक्मांगदापोटीं । स्वर्गीं झाली दाटी विमानांची ॥ ४ ॥ तुका ह्मणे धन्य साचें पुत्रपण । वडिलांचें महिमान राखियेलें ॥ ५ ॥

12

॥ ५३७२ ॥ वारकरी जाणा कोणी । कुळें दोन्ही उद्धरी ॥ १ ॥ तयांसंगती मुढजन । होती पावन तात्काळ ॥ २ ॥ मेरु सम पुण्यराशी । वस्ती ज्यासी राहिला ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम साचें । घ्या फुकाचें वाचेसी ॥ ४ ॥

॥ ५३७३ ॥ गुण ज्याचा जो अंतरीं । तोचि त्यासी पीडा करी ॥ १ ॥ विंचू वागवी विखार । त्यासी पैंजाराचा मार ॥ २ ॥ करी चोरी कर्म । खोडा पडे भोगी भ्रम ॥ ३ ॥ हर्षें चाहडी सांगे । ग्वाही देतां दंड मागे ॥ ४ ॥ परद्वार करी । दुःखभरें बोंवा मारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे संता निंदी । पडे यमाचिये बंदीं ॥ ६ ॥

॥ ५३७४ ॥ दुर्बळासी दान देई तोचि दाता । समर्थासी भलता जवळी करी ॥ १ ॥ गरीब नादान जरि आले शरण । शरणांगता मरण चिंतूं नये ॥ २ ॥ परदेशीं उपवासी बैसे भलते ताटीं । धरून मणगटीं उठवूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझे पुरवी मनोरथ । देई सदोदित प्रेमकळा ॥ ४ ॥

॥ ५३७५ ॥ बरें नाणवट निक्षेपिलें जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥ १ ॥ मजुराच्या हातें मापाचा उकल । मी येथें फोल सत्ता त्याची ॥ २ ॥ कुल्लाळाचे घरीं कुंभाच्या आकृती । पाठविल्या जाती पाकस्थला ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेंचि जिवन नारायणें । प्रभा जातां किरणें प्रकाशलीं ॥ ४ ॥

॥ ५३७६ ॥ कोणी करो जपध्यान । कोणी साधो गोरांजन ॥ १ ॥ नवजाऊं तया वाटा । नाचूं पंढरीचोहाटा ॥ २ ॥ कोणी करो आत्मस्तुती । कोणा होत नित्य मुक्ती ॥ ३ ॥ तुका ह्मणे छंद । आह्मा हरिच्या दासां निंद्य ॥ ४ ॥

॥ ५३७७ ॥ शरीर विटाळाचें आलें । शरीर मायामोहपाश जालें ॥ पतन शरीराच्या मुळें । शरीर काळें व्यापिलें ॥ १ ॥ शरीर उपमे चांगलें । शरीर सुखाचें घोसुळें ॥ शरीर होय साध्य केलें । शरीर परब्रह्म ॥ २ ॥ शरीर दुःखाचें आगर । शरीर रोगाचें भांडार ॥ शरीर दुर्गंधीची थार । शरीर नाहीं अपवित्र तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ५३७८ ॥ शरीरें सकळही सिद्ध । शरीर निधीचे ही निध ॥ शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यभागीं देव शरीर ॥ १ ॥ शरीरा सुख नें-

दावा भाग । नेंदावें दुःख न करी भोग । नव्हे वोखटें ना चांग । तुका ह्मणे वेग हरीभजनीं ॥ २ ॥

॥ ५३७९ ॥ चित्ताच्या संकोचें कांहींच न घडे । अतिशय वेडे चार तेचि ॥ १ ॥ जिवींचें जाणावें या नांवें आवडी । हेंकड ते वोढी अमंगळ ॥ २ ॥ काळाविण कांहीं नाहीं रूचों येत । करून संकेत ठेवियेले ॥३॥ तुका ह्मणे कळे वचनें चांचणी । काय तें वोलुनी वेळोवेळां ॥ ४ ॥

॥ ५३८० ॥ भक्तिविण देवा । कैंच्या रूपें घडती सेवा ॥ १ ॥ शोभविलें येरा । सोनें एकांग हीरा ॥ २ ॥ देवाविण भक्ता । कोण देईल निष्कामता ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळा । माते श्रेष्ठ जैसा झाला ॥ ४ ॥

॥ ५३८१ ॥ शुरां साजती हत्यारें । गांड्या हांसतील पोरें ॥ १ ॥ काय केली विटंबना । मोतीं नासिकावांचून ॥ २ ॥ पतिव्रते रूप साजे । शिंदळी काजळ लेतां लाजे ॥ ३ ॥ दासीपत्नीसुता । नव्हे सरी एकचि पिता ॥ ४ ॥ तुका ह्मणे तरी । अंतर शुद्ध धंद्यावरी ॥ ५ ॥

॥ ५३८२ ॥ अजामिळ भिल्ली तारिली कुंटिणी । प्रसक्ष पुराणीं वंद्य होय ॥ १ ॥ नीचाचे जातीचा उंच वंद्य होय । श्रीहरीचे गाय गुणानुवाद ॥ २ ॥ साची निंदा करी साचो कुष्ठ वुद्धी । मुर्खे संवदणी रजकाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें भजन प्रमाण । काय थोरपण जाळशील ॥ ४ ॥

॥ ५३८३ ॥ धन्य तेचि प्राणी क्षमा ज्यांचे अंगीं । न भंगे प्रसंगीं धैर्यबळ ॥१ ॥ न ह्मणे कोणासी उत्तम वाईट । महत्व वरिष्ठ नसे जेथें ॥२॥ अंतरीं सबाह्य सारिखे निर्मळ । हृदय कोमळ गंगारूप ॥ ३ ॥ तुका ह्मणे काया कुरवंडीन तया । ठेवीन मी पाया मस्तक हें ॥ ४ ॥

॥ ५३८४ ॥ ज्याचा सखा हरी । सावरी विश्व कृपा करी ॥ १ ॥ ऐसा असूनी अनुभव । कासावीस होतो जीव ॥ २ ॥ करितां हरीचें चिंतन । सासि वाधूं न सके विघ्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी । प्रल्हादासी यत्न करी ॥ ४ ॥

॥ ५३८५ ॥ विरोधाचें मज न साहे वचन । वहु होतें मन कासावीस ॥ १ ॥ ह्मणवुनी जीवा न साहे संगती । वैसतां एकांतीं गोड वाटे ॥ २ ॥ देहाची भावना वासनेचा संग । नावडे उबग आला यांचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव अंतरे यामुळें । आशा मोहजाळें दुःख वाटे ॥ ४ ॥

॥ ५३८६ ॥ नाहीं धर्माची वासना । काय करुनी प्रदक्षणा ॥ १ ॥ असें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ॥ २ ॥ नये कृपा कांहीं केल्या । नाहीं नेम जीव गेल्या ॥ ३ ॥ जैसी खांडियाची धार । विठ्ठलपायीं तुका शूर ॥ ४ ॥

॥ ५३८७ ॥ ज्यासी माता परनारी । त्याचे मुखीं खरा हरी ॥ १ ॥ इतर पोटासाठीं सोंग । तेथें कैंचा पांडुरंग ॥ २ ॥ ज्याला परधन विष । तोचि खरा हरीदास ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य सत्य । कृष्णपायाची शपथ ॥ ४ ॥

॥ ५३८८ ॥ अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळां माळ असो नसो ॥ १ ॥ आत्मअनुभवीं चोखाळीलया वाटा । त्याचे माथां जटा असो नसो ॥ २ ॥ परस्त्रीचे ठायीं जो का नपूंसक । त्याचे आंगा राख असो नसो ॥ ३ ॥ परद्रव्या अंध निंदेसी जो मुका । तोची संत देखा तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५३८९ ॥ नरदेहा यावें हरिदास व्हावें । तेणें चुकवावें गर्भवासा ॥ १ ॥ नाहीं तरी वायां शीणविली माय । नरकासी जाय जन्मोजन्मीं ॥ २ ॥ तीर्थव्रतदान देवाचें पूजन । ऐसें हें साधन साधकाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुखीं नित्य ह्मणे हरी । तया सुखा सरी नाहीं पार ॥ ४ ॥

॥ ५३९० ॥ कवणाचें घर कवणाचें दार । सोडोनी संसार जाणे लागे ॥ १ ॥ जाणे लागे अंतीं एकला एकवट । व्यर्थ खटपट जन्मवरी॥२॥ जन्मवरी जाण संसारीं गोंविलें । नाहीं कांहीं केलें आत्महीत ॥ ३ ॥ आत्महीत गेलें संसाराचे ओढी । अंतीं कोण सोडी रामावीण ॥ ४ ॥ घातकचि आहे लोकांचा तो संग । ह्मणोनी निःसंग तुका राहे ॥ ५ ॥

॥ ५३९१ ॥ संकल्पा विकल्पा द्यावी तिळांजुळी । सुखें वनमाळी आठवावा ॥ १ ॥ आणीक तूं कांहीं न धरीं विचार । राहें निरंतर समाधानें ॥ २ ॥ मनासी विक्षेप उठे जरी नाना । भाकावी करूणा जिवेंभावें ॥ ३ ॥ तुका म्हणे पडे स्वरूपासी मिठी । मग पोटीं पाठीं आत्माराम ॥ ३ ॥

॥ ५३९२ ॥ कोणा मंचकीं पहुडणें । कोणा भुमीसी लोळणें ॥ १ ॥ कोणा वस्त्रें ढिगावरी । कोणा फाटकी गोधडी ॥ २ ॥ कोणा भोजन घृतापरी । कोणा कुंड्याची भाकरी ॥ ३ ॥ कोणी बैसावें वहनीं । कोणी

पायीं अनवाणी ॥ ४ ॥ जे जे जैशी वेळ पडे । तैसें भोगणेंच घडे ॥ ५ ॥
कोणी जन्मावें मरावें । कोणी सायोज्यासी जावें ॥ ६ ॥ कोणी सुखदुःख
विसरावें । तुका ह्मणे अक्षयी व्हावें ॥ ७ ॥

॥ ५३९३ ॥ आतां कळतसे देव । अनुभव अखंड ॥ १ ॥ सत्य सत्यत्व ऐसिया । नसे भया प्राणिया ॥ २ ॥ आन नसे दुजें ऐसें । स्वप्रकाश संचला ॥ ३ ॥ कधीं इंद्रिय न मनीं । समजुनी राहिला ॥ ४ ॥ तुका ह्मणे मोठा । आडफांटा नसावा ॥ ५ ॥

॥ ५३९४ ॥ कथा भगवंताची सार । सकळ तीर्थांचें माहेर ॥ १ ॥ गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागिरथी ॥ २ ॥ सेतुबंध वाराणसी । पुण्यलाभ हरिकथेसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतसंग । सदा कथेचा प्रसंग ॥ ४ ॥

॥ ५३९५ ॥ अवघाचि देव वेगळें तें काय । अर्थासाठीं डोय फोडूं पाहे ॥ १ ॥ अवघाचि दंभ घातलें दुकान । चाळविल जन पोटासाठीं ॥ २ ॥ काय आह्मी आतां पोटचि भरावें । जग चाळवावें भक्त म्हूण ॥ ३ ॥ तुका म्हणे आम्ही भावहीन जीव । म्हणोनि यादव दुरी झाला ॥ ४ ॥

॥ ५३९६ ॥ आधीं मन घेई हातीं । तोचि गणराजा गणपती ॥ १ ॥ मन इंद्रियांचा राजा । त्याची सर्वभावें पुजा ॥ २ ॥ मन जिवाचा प्रधान । मन माझा नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे मन चंचळ । हातीं येईल गुरुच्या बळें ॥ ४ ॥

॥ ५३९७ ॥ काय करुनी तीर्थाटण । अंगीं भरले अवगुण ॥ १ ॥ मनसंकल्याचीं पापें । न जातो तीर्थाचिया बापें ॥ २ ॥ काय करुनियां जप । चित्तीं नाहीं अनुताप ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्म सोपें । पापें जाती अनुतापें ॥ ४ ॥

॥ ५३९८ ॥ गुरुच्या सेवेसी ज्यासी हो कंटाळा । पाहूं नये डोळां पतीत तो ॥ १ ॥ हत्यादिक दोष प्रायश्चित्तें जाती । गुरुद्रोह निश्चिती जात नाहीं ॥ २ ॥ तुका म्हणे जरी होय गुरुदया । तेणें जाय वांया दोष त्याचा ॥ ३ ॥

॥ ५३९९ ॥ सत्य बोले निरंतर । तोच पुण्याचा सागर ॥ १ ॥ देव त्यानें जिंकियेला । तिहीं लोकीं मानवला ॥ २ सर्वां भूतीं झाला लीन । टाकुनियां अभिमान ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन्मुनियां । शांतिसुख लाभे तया ॥ ४ ॥

॥ ५४०० ॥ सहातें जो नाशी साधी नारायण । सन्यासी तो जाण धन्य एक ॥ १ ॥ ब्राह्मण तो जाण जाणे ब्रह्मज्ञान । तोचि नारायण वेद-मूर्ती ॥ २ ॥ शेवडा तो जाणा जाणे सारासार । निरंजन पेठ वसाविली ॥३॥ मलंग तोचि जाणा साधी निज मन । होऊनी उन्मन बैसलासे ॥४॥ योगि तोचि जाणा जाणे योगकळा । होउनि विमळा निवृत्तीसी ॥ ५ ॥ जंगम तोचि जाणा साधी आत्मलिंग । लिंग देहभंग करुनियां ॥ ६ ॥ ऐसें षडदर्शनीं जाणें हेंचि वर्म । नसतेंचि मुंडण करुनी काय ॥ ७ ॥ तुका ह्मणे जेव्हां गळे अभिमान । तोचि एक जाण धन्य योगी ॥ ८ ॥

॥ ५४०१ ॥ काय एक दिवस गेलें हो वऱ्हाड । तें आलें सांकड कथेमाजि ॥ १ ॥ क्षण एके ठायीं मन स्थिर नाहीं । अराणुक कांहीं होईल पुढें ॥ २ ॥ कथेसी विसर दोषामुळें होय । तरुणोपाय कैंचा मग ॥ ३ ॥ काय हो सोसुनी उरलें तें मागें । घटिका एका संगें काय गेलें ॥ ४ ॥ तुका ह्मणे हेचि बोलावया चाड । उभयता नाड हित असे ॥ ५ ॥

॥ ५४०२ ॥ जयाचिये योगें उद्धार वंशाचा । तोचि हो दैवाचा इह लोकीं ॥ १ ॥ आनंद वडिलांचे न माये अंतरीं । येऊनी संसारीं धन्य झालों ॥ २ ॥ आपण तरोनि वंश उद्धारिला । उपेगासी आला जगाचिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे दोष तयाचे संगती । लयातें पावती तात्काळचि ॥ ४ ॥

॥ ५४०३ ॥ नाश झाला आयुष्याचा । प्राणी पाहुणा यमाचा ॥ १ ॥ पात्र पाहोनी निश्चित । तैसाचि दंड करीत ॥ २ ॥ ऐसें दुःख भोगी नाना । कोणी तया सोडविना ॥ ३ ॥ तुका प्रार्थी वारंवार । नको देवा हा जंजार ॥ ४ ॥

॥ ५४०४ ॥ कथाड्यासी कैंचा भाव । पुजाऱ्यासी कैंचा देव ॥ १ ॥ हे तो पोटाचे विकारी । ब्रह्म लावी कांद्यावरी ॥ २ पुराणिका कैंचें वित्त । पंडिता कैंची नीत ॥ ३ ॥ तीर्थवाशा कैंचें व्रत । क्षेत्रवाशा कैं दैवत ॥ ४ ॥ तुका ह्मणे कासारीं । प्रतिमा मांडिल्या बाजारीं ॥ ५ ॥

॥ ५४०५ ॥ झालें फळ तेव्हां राहिलें पिकोन।जरी तें जतन होय देंठीं ॥१॥ नामेंचि सिद्धि नामेंचि सिद्धि । व्यभिचारबुद्धि न पवतां ॥ २ ॥ चा-

लिला तो पंथ पावविल ठाया । जरी आड तया नये कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मधीं पडती आघात । तेणें होय घात हानी लाभ ॥ ४ ॥

॥ ५४०६ ॥ असावा तो पुत्र एक हरिदास । जेंवि देवकीस कृष्ण-मूर्ती ॥ १ ॥ काय शत मुर्ख गांधारीचे पोटीं । केला जगजेठी शत्रु पूर्ण ॥ २ ॥ हरीसी विन्मुख जळो ते संतती । पितरा घालिती अधःपाता ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याचा वंश तो पवित्र । तेथेंचि सुपुत्र गुरुभक्त ॥ ४ ॥

॥ ५४०७ ॥ प्रेमाविण जें जें केलें । निरर्थक वांयां गेलें ॥ १ ॥ मुखें करितो कीर्तन । मनीं विषयाचें ध्यान ॥ २ ॥ केंव्हां सरेल हे कथा । चित्त ठेविलें मन्मथा ॥ ३ ॥ ऐसें श्रवण कीर्तन । गेलें ओहळीं वाहोन ॥ ४ ॥ तुका ह्मणे पांडुरंग । जाणतसे अंतरंग ॥ ५ ॥

॥ ५४०८ ॥ थोडकेंचि खरें बरें । मोठा कासया डोंगर ॥ १ ॥ अ-मृताचा एक बिंदु । क्षार कासया तो सिंधु ॥ २ ॥ जंव कस्तुरी सुवास । मोठा नलगे कापूस ॥ ३ ॥ राम नाम एकवार । मायानदी करी पार ॥ ४ ॥ तुका ह्मणे गजेंद्रानें । गेला नामें उद्धरून ॥ ५ ॥

॥ ५४०९ ॥ भूतां अन्न पशू तृण । सर्पमात्रीं हर पवन ॥ १ ॥ होम द्रव्य हुताशन । जळचरां जलपान ॥ २ ॥ जें जें युक्त जयापरी । निर्मीतसे माझा हरी ॥ ३ ॥ भक्तां प्रेमळा जीवन । तुका ह्मणे नारायण ॥ ४ ॥

॥ ५४१० ॥ जन्मुनियां देहभावासी जाळावें । तरी ह्मणवावें हरि-दास ॥ १ ॥ मीपण अंतरीं वासना शिदोरी । बांधिली जिव्हारीं बळकट ॥ २ ॥ तेणें रंगवुनी भगवें कां केलें । ढोंगावया गेलें हरिविणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सोंग आणिलें नटानें । राजा तो होऊन भीक मागे ॥ ४ ॥

॥ ५४११ ॥ होती सोयरे धायरे । संपत्तीचिये आधारें ॥ १ ॥ दैवें गेलें तेंचि धन । न पुसा हो पिसून ॥ २ ॥ हेळसिती नरनारी । मेला जळो हा भिकारी ॥ ३ ॥ भाजी न मिळे खायासी । दीन मरे उपवासी ॥ ४ ॥ तुका ह्मणे हरिविण । नरा नाहीं धनमान ॥ ५ ॥

॥ ५४१२ ॥ हरी करितां सोयरा । सर्व लाभ येती घरा ॥ १ ॥ हरी पायीं रिद्धी सिद्धि । दासी वोळंगती निधी ॥ २ ॥ हरीपाय आयतन । चौदा लोक त्रिभुवन ॥ ३ ॥ हरी मंगळा मंगळ । हरी माझा हा निर्मळ ॥ ४ ॥ तुका ह्मणे पूर्व सार । वेद जाणताती हार ॥ ५ ॥

॥ ५४१३ ॥ काळावरी हरीसत्ता । नामरूपादि विधाता ॥१॥ माया-विपीनदहन । सत्ता एक करी जाण ॥ २ ॥ सत्ता हालवी ब्रह्मांड । सत्ता हरीची प्रचंड ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाणे सत्ता । तोचि देवा आवडता ॥ ४ ॥

॥ ५४१४ ॥जन्मांतर हें बलिष्ट । भोगवीत सुष्ट दुष्ट ॥ १ ॥ जन्मांतर नेउनियां । दाखवीत हरीपायां ॥ २ ॥ जन्मांतर गर्भवासी । भोगवीत नाना कुसी ॥ ३ ॥ जन्मांतर हें सोडीना । प्राणिमात्र त्रिभुवना ॥ ४ ॥ तुका ह्मणे जन्मांतर । माझें आहे रघुवीर ॥ ५ ॥

॥ ५४१५ ॥ वेदशास्त्रें देवा गाती । तेथें पंडित भुलती ॥ १ ॥ कर्म धर्म हेंचि थोर । गुरु देव नको हार ॥ २ ॥ ऐसे नाडलें बहुत । नकळेची आत्महित ॥ ३ ॥ कर्म धर्म हे देहींचे । हे तों असत्य मुळींचे ॥ ४ ॥ तुका ह्मणे खरें घ्यावें । तेव्हां लटिकें सांगावें ॥ ५ ॥

॥ ५४१६ ॥ खरें नाहीं हाता आलें । टाकूं नये खोटें भलें ॥ १ ॥ तया कैंचा रघुपती । आचरती पापमती ॥ २ ॥ गुरुअंजनावांचून । नाहीं प्राप्त नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे दुधपाणी । प्राशी हंस निवडोनी ॥ ४ ॥

॥ ५४१७ ॥ वर्णाश्रम धर्म नित्य अनुष्ठान । विषय बुद्धीनें जाय वांयां ॥ १ ॥ भागवत धर्म विष्णुपरायण । विषय० ॥ २ ॥ अहिंसा लक्षण अक्रोध वचन । विषय० ॥ ३ ॥ निस्पृह राहणें परिग्रह नेणें । विषय०॥४॥ हरीचें कीर्तन सभेमें करून । विषय० ॥५॥ संताचे सेवनें न शिणेचि मन । विषय०॥६॥तुका ह्मणे तुह्मा सांगतों मी खूण॥निर्विषय मन करा तह्मी ॥७॥

॥ ५४१८ ॥ डफगाणें गातां काय सुख आहे । ऐकतां तें पाहे महा पाप ॥ १ ॥ गीता भागवत आणि नारायण । अठराही पुराणें ऐकेना कां ॥१॥नराचें सोंग नर जे पाहति । उभयतां जाती नर्कामध्यें ॥ ३ ॥ ऐशिया शब्दांचा वीट मानुं नका । विनावितसे तुका सकळांसी ॥ ४ ॥

॥ ५४१९ ॥ राधा होऊनियां नाचे जो पोगडा । तो होय हिजडा जन्मोजन्मीं ॥ १ ॥ तयाचिया मागें डफ वाजविती । तेही नर्का जाती शत जन्मीं ॥ २ ॥ तयाचा तमाशा प्रीतीनें पाहती । तेही नर्का जाती शत जन्मीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हें वचन मानी जो असत्य । तोही नरका जात रवरवासी ॥ ४ ॥

॥ ५४२० ॥ हरिकृपा हेंचि अनंत कल्याण । दाखवी चरण दयाळू जो ॥ १ ॥ नंदयशोदेच्या पुण्या नाहीं पार । झाला रमावर बाळ त्यांचा ॥ २ ॥ पांडवांचे अश्व धुतले गोपाळें । संकटीं स्नेहाळें रक्षियेलें ॥ ३ ॥ तुका म्हणे मुख्य कृपा देवाजीची । नाहीं इतरांची सत्ता तेथें ॥ ४ ॥

॥ ५४२१ ॥ अनंताची लिला न कळे ह्मणोनी । लागले चरणीं ब्रह्मादिक ॥ १ ॥ गाई गोप झाला स्वयें घननीळ । कळलें सकळ विधातिया ॥ २ ॥ गर्वहत झाला शरण रिघाला । स्तवोनियां गेला निजस्थाना ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरीहरांसी न कळे । अच्युताचे लिळे अगम्य ते ॥ ४ ॥

॥ ५४२२ ॥ कडु तो भोपळा वाराणशी गेला । काय तो मुकला कडुपणा ॥ १ ॥ अंगीं लावितसे शेण आणि माती । काय तो श्रीपति त्यासी भेटे ॥ २ ॥ वेदशास्त्र झाला जरी तो संपन्न । काय नारायण कृपा करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी देहाचें सांडणें । तरीच नारायण त्यासी भेटे ॥ ४ ॥

॥ ५४२३ ॥ कागाचिये विष्ठे जन्म सा पिंपळा । पांडवांच्या कुळा पाहतां दोष ॥ १ ॥ गायत्री स्वमुखें भक्षी अमंगळ । मिळाल्या ओहळ वंद्य गंगा ॥ २ ॥ वाल्मीक विश्वामित्र वासिष्ठ नारद । यांचे पूर्व शुद्ध काय होतें ॥ ३ ॥ नव्हतीं झालीं याचि कर्में नरनारी । अनुतापें हरी स्मरतां मुक्त ॥ ४ ॥ शकुंतलासुत कर्ण शृंगी व्यास । यांचे नामें नाश पातकासी ॥ ५ ॥ तुका म्हणे मूळ नाठवी श्रीहरी । कूळ जो विचारी नर्क त्यासी ॥ ६ ॥

॥ ५४२४ ॥ बारा गांव पाणी जाळी । समुद्रांत ज्वाळमाळी ॥ १ ॥ राहे उदधिउदरीं । हरीआज्ञा पाळी शिरीं ॥ २ ॥ नुलंघवे ते मर्यादा । सागरासी काळीं कदा ॥ ३ ॥ वाउगी हे पृथ्वी शिरीं । वागवीत निरंतरीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे सर्व सत्ता । एक हरी जगत्राता ॥ ५ ॥

॥ ५४२५ ॥ चंद्र सूर्य फिरताती । वायुचक्रीं राहाटती ॥ १ ॥ नाहीं आकाशा टेंकण । समीरासी कोठें स्थान ॥ २ ॥ सर्वां चाळक श्रीहरी । जबरदस्त सत्ता शिरीं ॥ ३ ॥ तो हा विठ्ठल सांवळा । तुका ह्मणे विश्वडोळा ॥ ४ ॥

॥ ५४२६ ॥ डोळियांत डोळा कोण । न जाणती मूढ जन ॥ १ ॥ वाचा वदविता कोण । चळे वळे कैसा प्राण ॥ २ ॥ मन इंद्रियें सकळ । वर्ततातीं कोणे बळें ॥ ३ ॥ अन्नउदकपचन । केंवि होय तें क्षाळण ॥ ४ ॥ तुका ह्मणे हरीसत्ता । प्रतिपाळी सर्व भूतां ॥ ५ ॥

॥ ५४२७ ॥ आठवण नाठवण । होत हरीचे कृपेनें ॥ १ ॥ जीव जंतु आचरती । तया कैंची आपमती ॥ २ ॥ मुंगी आदि ब्रह्मादिक । सत्ता विठ्ठल चालक ॥३॥ तुका म्हणे सत्ता जाणे । तोचि नरनारायण ॥४॥

॥ ५४२८ ॥ वासुदेव सर्व जयासी प्रचीत । बाणली निश्चित गुरुकृपा ॥ १ ॥ तया नाहीं कांहीं उरलें किंचित । जाहला अद्वैत आपणचि ॥ २ ॥ न साहेचि बोल अनादिरव खोल । आत्मत्व पाहिल साचा तोचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा दुर्लभ महात्मा । चराचरी आत्मा स्वतः सिद्ध ॥ ४ ॥

॥ ५४२९ ॥ अमृताचे ताटीं बैसला भोजना । तक्राची वासना कैंची तया ॥ १ ॥ ऐरावतावरी वहन जयाचें । तट्टू कावाडाचें नको तया ॥ २ ॥ स्यमंतक मणी असे जया कंठीं । तया कांचवटी वाहवेना ॥ ३ ॥ तयेपरी जया आत्मलाभ झाला । असार तयाला वांती जैसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे हरीकृपेचें हें फळ । लाधला प्रांजळ निजरूप ॥ ५ ॥

॥ ५४३० ॥ ऐसी नको ते संपत्ती । जेणें पावे अधोगती ॥ १ ॥ नको असुरीचा संग । अंतरेल पांडुरंग ॥ २ ॥ दैवी संपत्ती असावी । गोडी ईश्वरीं लागावी ॥ ३ ॥ तुका ह्मणे साधुसंत । मज बहु आवडत ॥ ४ ॥

॥ ५४३१ ॥ पाहिल्या विठ्ठल विरे सर्व चिंता । प्रेम वाढे चित्ता सुख होय ॥ १ ॥ त्रितापाची धुनी होय तत्क्षणीं । मोक्ष ये धांवोनी भक्तांपाशीं ॥ २ ॥ चंद्रभागे स्नान ऐकिल्या कीर्तन । ओस पडे स्थान यमपुरीं ॥ ३ ॥ त्रैलोक्याचे देव येती दरुशना । प्रसादाचा दाणा घ्यावयासी ॥ ४ ॥ दुर्लभ हे पाय विठ्ठलाचे सम । अरी भक्ता सम तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ५४३२ ॥ सगुणाची प्रीति असंत अर्जुना । विश्वरूपीं जाणा न बैसेचि ॥ १ ॥ अष्टादश अध्याय पाजीलें अमृत । गीता हे अद्वैत किरीटीसी ॥ २ ॥ बोधुनियां केला आत्मपदीं स्थिर । संग्रामा सत्वर सिद्ध केला ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव करील तें होय । इतराचें जाय वाहवत ॥ ४ ॥

॥ ५४३३ ॥ धन्य तयाची जननी । जया वश चक्रपाणी ॥ १ ॥ धन्य तोचि त्रैलोक्यांत । झाला आपण अद्वैत ॥ २ ॥ झाला शून्य भेदभाव । जनीं वनीं रमाधव ॥ ३ ॥ तुका ह्मणे अवतार । ऐसा नर तो शंकर ॥ ४ ॥

॥ ५४३४ ॥ मनी देहीं नाम भिन्न । ठेविताती अभिधान ॥ १ ॥ दोहीं देह काय आहे । ज्ञान बोध लोपलाहे ॥ २ ॥ न विचारी कोणी कोणा । विसरले रामराणा ॥ ३ ॥ तुका ह्मणती देहाला । असो याची लज्जा तुला ॥ ४ ॥

॥ ५४३५ ॥ गेलें बाळपण खेळीं । खातां हिंडता सकळीं ॥ १ ॥ तारुण्याचा भर गेला । विष विषय भोगिला ॥ २ ॥ वृद्धपण अंगीं आलें । प्राणी हीन दीन झाले ॥ ३ ॥ शत नरुपांची माती । केली विण रघुपती ॥ ४ ॥ तुका ह्मणे नारायण । अंतरला तया जाण ॥ ५ ॥

॥ ५४३६ ॥ वृद्धपणीं माळ धरी । ज्ञान नाहीं तिळभरी ॥ १ ॥ प्राप्त झाला तृषाकाळ । कूप खणीतो गयाळ ॥ २ ॥ क्षुधा लागली गव्हारा । तेव्हां पेरीतो बाजरा ॥ ३ ॥ आधीं बुडविलें सर्व । अंतीं आलें यमपर्व ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझा हरी । अभाग्यासी राहे दुरी ॥ ५ ॥

॥ ५४३७ ॥ गुरुविण पार होणें । न घडेचि मूढजनें ॥ १ ॥ यज्ञ तप दान केलें । चार वेद अभ्यासिले ॥ २ ॥ अधिकचि गुंता झाला । अहंकार विरुढला ॥ ३ ॥ भोग मोक्ष तया येती । अंतीं नेती अधोगती ॥ ४ ॥ तुका ह्मणे तया नरा । हरी न मिळे सोयरा ॥ ५ ॥

॥ ५४३८ ॥ केला सोयरा श्रीहरी । तया नाहीं जन्मफेरी ॥ १ ॥ झाला निर्भय अंतरीं । गुरुदेवदास्य करी ॥ २ ॥ आत्मज्ञान पाउनियां । रत झाला हरिपायां ॥ ३ ॥ तुका ह्मणे जोडियेलें । तेणें धन जें आपुलें ॥ ४ ॥

॥ ५४३९ ॥ निजधन ठेवी भारी । न पुसती नरनारी ॥ १ ॥ नारदादी वडिलांनीं । हांडा ठेविला गाडोनी ॥ २ ॥ आहे हृदयमंदिरीं । न पाहती जाती दुरी ॥ ३ ॥ आहे ठाउकें जयाला । गुरुकृपें तो धाला ॥ ४ ॥ तुका ह्मणे निवडती । थोडे फार भुललेती ॥ ५ ॥

॥ ५४४० ॥ पूर्व दोष आड येती । हरिपायीं नाहीं प्रीति ॥ १ ॥ बळें घालिती अघोरीं । संतगुरुनिंदा करी ॥ २ ॥ दासीलागीं वेंची धन । धर्म नाहीं मुष्टि अन्न ॥ ३ ॥ तुका ह्मणे निरुपायें । कर्म बळिवंत होय ॥ ४ ॥

॥ ५४४१ ॥ माता अंगिकारी बाळा । पुरवीत त्याचा लळा ॥ १॥ तें-
चि बळ अरण्यांत । त्यागितांचि होय घात ॥ २ ॥ तयेपरी हरिविण । पापी
नुद्धरती दीन ॥ ३ ॥ तुका ह्मणे पराधीन । जीव हरीचे स्वाधीन ॥ ४ ॥

॥ ५४४२ ॥ पराधीनता जाणावी । अहंकृती बुडवावी ॥ १ ॥ जेथें सर्व
सत्ता वसे । प्रीति धरितां मी वसे ॥ २ ॥ दोहीं हातीं टाळी वाजे । एके
हातें काय साजे ॥ ३ ॥ देवभक्त दोहींकडे । परस्परें प्रीति जोडे ॥ ४ ॥
तुका ह्मणे जैसा भाव । तैसा आहे रमाधव ॥ ५ ॥

॥ ५४४३ ॥ आत्मसुख सर्वां सम । परी प्राक्तन विषम ॥ १ ॥ ज्ञान-
स्वरूप होउनी । भोगितातीं ते उन्मनी ॥ २ ॥ मीतूंपण विसरलें । निज
तत्वीं सुखीं झाले ॥ ३ ॥ शेष उरलें प्रारब्ध । सारितातीं निज बोधें ॥ ४॥
तुका ह्मणे परंपरा । राम करिती सोयरा ॥ ५ ॥

॥ ५४४४ ॥ सखा सोयरा श्रीराम । जया हाचि धर्म नेम ॥ १ ॥
जनीं वनीं राम डोळां । त्याचे बैसला सांवळा ॥ २ ॥ ऐसें अविनाश रूप ।
हाचि विठ्ठल चिद्रूप ॥ ३ ॥ तुका ह्मणे डोळेभरी । भक्त पाहती
श्रीहरी ॥ ४ ॥

॥ ५४४५ ॥ त्राता मेघ चातकाचा । तेवि विठ्ठल दासांचा ॥ १ ॥
घडी पळ सांभाळित । प्रेमळासी दयावंत ॥ २ ॥ आदि अंतीं पायांपाशीं ।
ठेवी माउली कां जैशी ॥३॥ तुका ह्मणे भाव पोटीं । तयापाशीं जगजेठी॥४॥

॥ ५४४६ ॥ जगद्गुरु जगत्पते । दयावंत रघुपते ॥ १ ॥ मज दाखवी
चरण । आघात हे चुकवून ॥ २ ॥ फांसा काढी वासनेचा । दास करीं
काया वाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दीनबंधु । मज तारी कृपासिंधु ॥ ४ ॥

॥ ५४४७ ॥ भ्रमतातीं सर्व भूतें । आपुलालिये संचितें ॥ १ ॥ क्रिय-
माण पूर्व फळ । भोग भोगिती बहळ ॥ २ ॥ जो कां योगभ्रष्ट होय । तोचि
धरी हरीपाय ॥ ३ ॥ जागा होउनी सुटला । जन्ममरणा मुकला ॥ ४ ॥
तुका ह्मणे ठेवा जैसा । उपेगासी येतो तैसा ॥ ५ ॥

॥ ५४४८ ॥ जन्मवरी याती केली । हरिभक्ति आराधिली ॥ १ ॥
झाली अप्रीत सकळ । हारपली तळमळ ॥ २ ॥ विष्टामूत्र त्याग केला ।
आत्मरूपीं सुखी झाला ॥ ३ ॥ तुका ह्मणे पुण्यवंत । ध्यानें पावला
अनंत ॥ ४ ॥

॥ ५४४९ ॥ अष्ट धातु वेगळाली । आटवीतां वांया गेली ॥ १ । सोनें सोनियांत मिळे । दुजें घालितां वितुळे ॥ २ ॥ संत आणि तो अधम । कल्पकोटी नोहे सम ॥ ३ ॥ शुभ्र हिरा आणि गार । मोल भेद अनिवार ॥ ४ ॥ तुका म्हणे पूर्ण योगी । तोचि मिळे पांडुरंगीं ॥ ५ ॥

॥ ५४५० ॥ हरीध्यान कर्म तोडी । अमृतानें पडे बेडी ॥ १ ॥ पुण्य क्षीण होतां आले । मृत्युलोकीं ते जन्मले ॥ २ ॥ पुनरपि जन्ममृत्य । भोग भोगिती अमित ॥ ३ ॥ तुका ह्मणे नारायण । नामें तुटतें बंधन ॥ ४ ॥

॥ ५४५१ ॥ जन्मवरी केलें ध्यान । अंतीं तेचि आठवण ॥ १ ॥ आळी भिंगुरटी झाली । पूर्व देह विसरली ॥ २ ॥ गुरुभक्तहरीपाय । निशिदिनीं ध्यात जाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे आत्मपद । चित्तीं त्यास दे गोविंद ॥ ४ ॥

॥ ५४५२ ॥ जन्मवरी कुटुंबासी । पाळियेलें अहर्निशी ॥ १ ॥ झिजउनी स्वयें अंग । मानियेला सत्य संग ॥ २ ॥ कामा नये कोणी अंतीं । देह स्मशानीं जाळिती ॥ ३ ॥ हरीविण व्यर्थ गेला । प्राणी पूर्ण नागवला ॥ ४ ॥ तुका ह्मणे अनहित । ज्याचें त्यानें केलें सत्य ॥ ५ ॥

॥ ५४५३ ॥ तीर्थातीर्थ हरीपाय । नाम तेंचि रूप होय ॥ १ ॥ स्नान तेचि उपरती । भक्ति होय अद्वयतीं ॥ २ ॥ अप्रियता ते विरक्ति । सर्व ठायीं अनासक्ति ॥ ३ ॥ सुख तेंचि अकर्तृत्व । आहे जैसें अनादित्व ॥ ४॥ तुका ह्मणे हा सिद्धांत । वेदराज बोले अंत ॥ ५ ॥

॥ ५४५४ ॥ ध्येय ध्यान धाता होये । पूजा भेद करिताहे ॥ १ ॥ ध्येय देव हा वरिष्ठ । ध्याता आपण कनिष्ठ ॥ ५ ॥ ध्यान पूजन प्रेमळ । झाली त्रिकुटी सकळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे कच्चेपण ॥ अद्वइत ज्ञान नेणें ॥ ४॥

॥ ५४५५ ॥ अद्वइत हरीपाय । गुरुगम्य ज्ञान होय ॥ १ ॥ आत्म प्रचितीं वांचोनी । पूर्ण बोध कैंचा मनीं ॥ २ ॥ गुरुकृपा अनुभव । एक झालिया सदैव ॥ ३ ॥ तुका ह्मणे पूर्व पुण्यें । आत्मप्राप्ती होय धन्य ॥ ४ ॥

॥ ५४५६ ॥ जया पाहिजे कल्याण । तेणें ध्यावा नारायण ॥१ ॥ सर्व वासनेचा त्याग । करा शुद्ध अंतरंग ॥ २ ॥ सद्गुरूचें वचन । धरा नाम संकीर्तन ॥ ३ ॥ येणें जोडे समाधान । पूर्ण सिद्धि तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५४५७ ॥ आदि अंतीं माझ्या विठ्ठलाचे पाय । मध्यें होय जाय मृगजळ ॥ १ ॥ बुद्धिबळाचिया खेळाचिये परी । जित किंवा हारी ल-

टकीच ॥ २ ॥ तैसा मायामय ब्रह्मांड हा गोळ । लटिकाची खेळ दृश्य-भास ॥ ३ ॥ तुका ह्मणे खरे निवडुनी घ्यावें । स्वहित करावें ज्याचें त्यानें ॥ ४ ॥

॥ ५४५८ ॥ अभ्यासावांचुनी उडी महापुरीं । टाकी पैल तीरीं जाय कैसा ॥ १ ॥ पेटे किंवा कास असावी तयास । निर्भयता ज्यास एक नाहीं ॥ २ ॥ तेवि हरीमार्गी लागीं मुख्य गुरु । भवार्णवीं तारूं दुजा नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळें घालुनियां कास ॥ धरावा विश्वास गुरु-पायीं ॥ ४ ॥

॥५४५९॥ आपुलिया सत्ते कांहीं तिळभरी । होईल श्रीहरी चाळक तो ॥१॥ अवस्था ज्या चारी अंतर्बाह्यात्कारीं। विहार मुरारी प्रकाशीत ॥२॥ अनंत ब्रह्मांडें माझारी सकळ । सुत्रात्मा दयाळ पांडुरंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया आठवावें मनीं । तरीच जननी धन्य होय ॥ ४ ॥

॥ ५४६० ॥ तरलों म्हणती आधीं ते बुडती । गीतेंत निश्चिती हरी बोले ॥ १ ॥ जो नाहीं बुडाला तो काय तरला । अज्ञानें बुडाला बाह्य दृष्टी ॥ २ ॥ जन्मा नाहीं आला तो कैसा हो मेला । पूर्वत्वें संचला अना-दि जो ॥ ३ ॥ तुका ह्मणे आप आपणासी जाणे । अनुर्वाच खूण तोचि पावे ॥ ४ ॥

॥ ५४६१ ॥ हरिकृपा होय तरीच बंधनें । तुटतील जाण पूर्व पुण्यें ॥ १ ॥ हरिकृपा होय तरीच संतती । अखंड भजती विठ्ठलासी ॥ २ ॥ ह-रिकृपा होय तरीच मानसीं । आठव भक्तीसी प्राणियांच्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिकृपेविण कांहीं । केलें तें सर्वही वायां जाय ॥ ४ ॥

॥ ५४६२ ॥ हरिकृपा होय ऐसाचि उपाय । करी त्याची माय धन्य झाली ॥ १ ॥ हरिकृपा होय तरीच सार्थक । जन्म निरार्थक नोहे त्याचा ॥ २ ॥ हरिकृपा होय देहभाव जाय । आत्मलाभ होय स्वतःसिद्ध ॥ ३ ॥ तुका म्हणे हित संतसंगाविण । हरिकृपा होणें नाहीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ५४६३ ॥ हरिविण वाणी जळो हे पापिणी । रजकसौंदणीं अशु-द्ध ते ॥ १ ॥ हरिविण मन जैसा होय श्वान। होमशाळे जाण अशुद्ध ते ॥२॥ हरिविण काया प्रेतरूप वांया । शिवूं नये तया अशुद्ध ते ॥ ३ ॥ तुका म्हणे हरिपायां जे लागले । तेचि वंद्य झाले तिहीं लोकीं ॥ ४ ॥

॥ ५४६४ ॥ कलियुगीं शत मानाचे प्रमाण । आयुष्यवर्धन पुढें नाहीं ॥ १ ॥ मातापितयाच्या रेतरक्तापोटीं । निपजली सृष्टी जीवमात्र ॥ २ ॥ तयाचा विचार करोनी त्या मनीं । आलों मी कोठोनी जाणें कोठें ॥ ३ ॥ तुका म्हणे देहीं विवेक न केला । तोचि नागविला आत्महिता ॥ ४ ॥

॥ ५४६५ ॥ साधुसी न कळे खळाचें अंतर । कपटी जिव्हार सर्वकाळ ॥ १ ॥ पतिव्रता नेणे शिंदळीचें मन । वरपंगी जाण बोल तिचे ॥ २ ॥ बकाचिया ध्याना काय जाणे मासा । क्षुद्र वाघ जैसा मक्षिकेसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे खऱ्या खोट्याची संगती । न घडो श्रीपती दयाळुवा ॥ ४ ॥

॥ ५४६६ ॥ धन्य पुत्र मायें पोटीं । निपजले रत्नकोटी ॥ १ ॥ हरीरूप अंगें झाला । ज्ञानस्वरूप शोभला ॥ २ ॥ कोटी ब्रह्मांडांचा धणी । प्रकाशक स्वयें मानी ॥ ३ ॥ तिळभरी अहंकार । नाहीं नये वृत्तीवर ॥ ४ ॥ तुका ह्मणे पूर्णपणें । जनीं वनीं तो आपण ॥ ५ ॥

॥ ५४६७ ॥ हा विजयी नारायण । याचें करी जो चिंतन ॥ १ ॥ तया न विसंबे देव । दीनरक्षक माधव ॥ २ ॥ न पाहेचि कुळ याती । भाविकासी धरी हातीं ॥ ३ ॥ तो हा विठ्ठल चिद्घन । तुका ह्मणे सनातन ॥ ४ ॥

॥ ५४६८ ॥ कागा काय पयपान । राजहंस रुची जाणे ॥ १ ॥ सेवा पतीची शिंदळी । जाणे पतिव्रता बाळी ॥ २ ॥ भक्त अभक्त हे जाण । भक्ता प्रिय नारायण ॥ ३ ॥ तुका म्हणे तयेपरी । जगीं वर्तती अंतरीं ॥ ४ ॥

॥ ५४६९ ॥ वृक्ष उन्मळे छेदितां । घाव मुळासी पडतां ॥ १ ॥ अग्राकडोनियां नाश । कैंवि होय त्या वृक्षास ॥ २ ॥ मुळीं किंचित राहिली । वृक्षवृद्धी पुन्हा झाली ॥ ३ ॥ तैंवि मीपणाचें मूळ । ज्ञानें होतसे निर्मूळ ॥ ४ ॥ तुका म्हणे ध्यावें चित्तीं । निःसंगती शस्त्र हातीं ॥ ५ ॥

॥ ५४७० ॥ सार्वभौम राजे युगायुगीं झाले । तयां आठविलें कोणें सांगा ॥ १ ॥ माझ्या विठ्ठलाचे अनंत अपार । गुण अवतार वर्णितातीं ॥ २ ॥ वेद शास्त्रें सर्व हरीलागीं ध्याती । सोडविता अंतीं दुजा नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय मानवाची स्तुती । सज्ञानें ते अंतीं करूं नये ॥ ४ ॥

॥ ५४७१ ॥ हानी मृत्यु लाभ तिन्ही । कोणी नाणिती प्रार्थुनी ॥ १ ॥ येती आपुलाले वेळे । आदळती तेव्हां कळे ॥ २ ॥ नाहीं परिहार यांचा । भोग अचुक दैवाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिहरां । न चुकेचि यांचा फेरा ॥ ४ ॥

॥ ५४७२ ॥ मायाभोंवरा चुकवी । एक हरीची परत्री ॥ १ ॥ हरीविण तरूं जाती । ते तों अधिक बुडती ॥ २ ॥ पुण्यवंत कोणी होय । तोचि धरी रामपाय ॥ ३ ॥ तुका म्हणे ते तरती । नामरूप ते धरती ॥ ४ ॥

॥ ५४७३ ॥ नामरूप नाहीं सोपें । मिळे गुरुचिया कृपें ॥ १ ॥ गुरुकृपा महा भारी । होय असत्या बोहरी ॥ २ ॥ त्याग असत्या कठीण । जगीं न सोडिती जाण ॥ ३ ॥ तुका म्हणे विषापरी । आहे गुरुकृपा खरी ॥ ४ ॥

॥ ५४७४ ॥ जन्ममृत्युभय नाहीं कवणासी । निर्भय मानसीं विचरती ॥ १ ॥ पुत्र वित्त दारा केला भरंवसा । पडियेला फांसा अविद्येचा ॥ २ ॥ सर्व सुख हेंचि विषय मानिलें । हरीस ठेविलें गुंडाळुनि ॥ ३ ॥ तुका म्हणे पूर्व दोष नावरती । तया रघुपती कैसा जोडे ॥ ४ ॥

॥ ५४७५ ॥ सर्वांचि अंतरें जाणतो श्रीहरी । तयापुढें चोरी केंवि घडे ॥ १ ॥ मनबुद्धि जाती धुंडाया पदार्थ । विठ्ठल समर्थ उभा तेथें ॥ २ ॥ परद्वार केलें एकांतीं जाऊन । मानियेलें मनीं तिजें नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे साक्षी अनंत ब्रम्हांडीं । तस्कराचे पिंडीं कैसा होय ॥ ४ ॥

॥ ५४७६ ॥ हरिचिया गुणा नाहीं पारावार । ध्यानीं उमावर आठवितो ॥ १ ॥ ब्रम्हा विष्णु देव इंद्रादि सकळ । व्यापारी गोपाळ न सोडिती ॥ २ ॥ हरिपायांविण विश्रांतीचें घर । त्रैलोक्यीं साचार दुजें नाहीं ॥ ३ ॥ तुका म्हणे सर्व सारांचेंही सार । पूर्ण सुखकर हरी असे ॥ ४ ॥

॥ ५४७७ ॥ पोसोनियां पिंड नाहीं कामा आला । अंतीं वांया गेला हरिविण ॥ १ ॥ दुध घृत लोणी पायस पक्कान्नें । धन वस्त्र धान्य दिलीं जया ॥ २ ॥ प्रयाणसमयीं वासना गुंतली । घरींच राहिलीं दारापुत्रीं ॥ ३ ॥ तुका म्हणे स्थूळ सुक्ष्म हे दुष्ट । नागविले स्पष्ट आत्मलाभा ॥ ४ ॥

॥ ५४७८ ॥ अचिंत्या अपारा लाविती जे गुण । जाणावे अज्ञान शिरोमणी ॥ १ ॥ माझ्या विठ्ठलाची माया घडी मोडी । अनंत ब्रम्हांडीं हरी साक्ष ॥ २ ॥ देवाजिची सत्ता घेऊनियां चाले । टाकीत पाउलें माया देवी ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी करुनी अकर्ता । जानकीचा भर्ता रामचंद्र ॥ ४ ॥

॥ ५४७९॥ पहा भाग्य रावणाचें । त्याला देणें शंकराचें ॥ १ ॥ ऐशींहजार ज्याच्या कांता । मंदोदरी पतिव्रता ॥२ ॥ तेहतीस कोटी देव । बंदींत घातले सर्व ॥ ३ ॥ ब्रम्हा पातडा तो वाची । बहु जबरदस्ती साची ॥ ४ ॥ चंद्रसूर्य मशाल धरी । दिवटी सलामाच्या वेळीं ॥ ५ ॥ यम ज्याची माकन आरी । पायीं चुकल्या रावण मारी ॥ ६ ॥ अग्नि ज्याचा रजक झाला । धुतो पागोटीं हा शेला ॥ ७ ॥ दारीं दिनकर कर जोडी । धाकें वायु घर झाडी ॥ ८ ॥ खंडेराव ज्याचा न्हावी । नित्य नेम आरसा दावी ॥ ९ ॥ गणपती थोर देव । गाढव वळायासी धांवे ॥ १० ॥ नवग्रहांची पाहिरी । सटवाई न्हाणें धुणें करी ॥ ११ ॥ ऐशीं हजार ज्याचे वीर । साठ सहस्र काठी कोर ॥ १२ ॥ जो कां लांब नव्वद गांव । कुंभकर्ण ज्याचें नांव ॥ १३ ॥ भोंवता समुद्राचा फेर । मध्यें सोन्याचें नगर ॥ १४ ॥ तुका म्हणे ऐसा मस्त । रघुविरें केला दस्त ॥ १५ ॥

॥ ५४८० ॥ नामरूप माया बोलावया ठाव । भागा आला भाव तयावरी ॥ १ ॥ शींव वाटे परी न खंडे पृथवी । शहाणे ते जिवीं समजती ॥ २ ॥ पोटा आला तिच्या लोळे मळ्यावरी । पारखी न करी खंती कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भक्तिसाठीं हरिहर । अरूपींचे क्षर विभाग हे ॥ ४ ॥

॥ ५४८१ ॥ अन्न देणार श्रीहरी । प्रतिपाळ तोचि करी ॥ १ ॥ जेणें अन्न उदक केलें । तेणें विश्व हें निर्मिलें ॥ २ ॥ हरिला चुकती बापुडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥३॥ तुका ह्मणे एक । विठ्ठल ब्रह्मांडनायक ॥ ४ ॥

॥ ५४८२ ॥ मुक्त होता परी वळें झाला बद्ध । घेउनियां छंद माझें माझें ॥ १ ॥ पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता तो ॥ २ ॥ तुका ह्मणे वांयां गेलें वायां विण । जैसा मृगशीण मृगजळीं ॥ ३ ॥

॥ ५४८३ ॥ ब्रह्मचारी तरी न ह्मणों नारदमुनी । गोपिका कामिनी इच्छितसे ॥ १ ॥ ब्रह्मचारी तरी न ह्मणों मारुती । क्रोधें अंगीं शक्ति ध-

डाडती ॥ २ ॥ ब्रह्मचारी तरी न ह्मणों भीष्म नरेंद्र । युद्ध वैराकार इच्छितसे ॥ ३ ॥ ब्रम्हचारी तरी न म्हणों शुक योगींद्र । कामें दिगांतर पळतसे ॥ ४ ॥ तुका म्हणे हें तो इंद्रियांचे जाती । ब्रम्हचारी मुर्ती वेगळ्याचि ॥ ५ ॥

॥ ५४८४ ॥ ब्रम्हचारी तरी पंडुसुतधर्म । सदा शुभ कर्म आचरतसे ॥ १ ॥ ब्रम्हचारी तरी विदेही भूपाळ । पांच सतमाळ वनिता ज्याच्या ॥२॥ ब्रम्हचारी तरी वसिष्ठ जमदग्नि । रेणुका कामिनी अंगसंग ॥ ३ ॥ तुका म्हणे काम क्रोध मदमत्सर । ब्रम्हीं केले स्थिर तोचि योगे ॥ ४ ॥

॥ ५४८५ ॥ भागवताचा भाव सांगवेल आव । करणी स्वभाव नये नये ॥ १ ॥ संतांची आकृति आणवेल युक्ति । काम क्रोध शांति नये नये ॥ २ ॥ अवताराचें सोंग आणवेल जाण । क्रिया तत्समान नये नये ॥ ३ ॥ तुका म्हणे विठ्ठलकृपेवांचुनी । बोलाऐसी करणी नये नये ॥ ४ ॥

॥ ५४८६ ॥ देव एक पंढरीराव । अंतर भाव तो जाणे ॥ १ ॥ रोगा ऐशा याव्या वल्ली । जाणे झाली बाधा ते ॥ २ ॥ नेदी रुका वेंचूं मोल । पाहे बोल प्रीतीचे ॥ ३ ॥ तुका म्हणे दयावंता । सदा चिंता दिनाची ॥ ४ ॥

॥ ५४८७ ॥ वांयां आवतणें जेविल्या साच । काय विश्वासाचें तेंचि खरें ॥ २ ॥ कोल्हाटिनी त्यागें आकाशीं खेळत । काय ते पावत मोक्षपद ॥ २ ॥ जळ मंडण्याचे घोडे ते नाचती । काय तगवती युद्धालागीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मतवादियाचें जिणें । दिसे लाजिरवाणें देखतांचि ॥ ४ ॥

॥ ५४८८ ॥ ज्यानें पेरिले धुतरे । त्याचे वांयां गेले सारे ॥ १ ॥ ज्यानें पेरिला एरंड । तो कां रुसे कवण्या तोंडें ॥ २ ॥ ज्यानें पेरियेला ऊंस । तोचि प्याला ब्रम्हरस ॥ ३ ॥ जैसें द्यावें तैसें घ्यावें । तुका म्हणे कां रुसावें ॥ ४ ॥

॥ ५४८९ ॥ आणिकां छळावया झालासी शहाणा । स्वहिता घातलें खाण ॥ अडके पैके करुनियां कृपणें सांचिलें धन । न जिरे क्षीर श्वाना भक्षितां याती तयाचा गुण ॥ तारुण्य दशे अधम पातला । दवडी हातपाय कान ॥ १ ॥ काय झालें यास वांया कां ठकले हातीं सांपडलें टाकीतसे । घेऊनि स्फटिकमणी टाकी चिंतामणी नागवेल आपुले इच्छे ॥ सिद्धी सेविलें सेविती अधम पात्राच सारिखें फळ । शिंपला मोती जन्मलें

स्वाती वरूशले सर्वत्र जळ ॥ कापुसपट नयेचि कारणा तयासी पातला काळ ॥ तेंचि भुजंगें धरियलें कंठीं विष झालें त्याचें गरळ ॥ २ ॥ भक्षून मिष्टान्न घृतसाखरे सहित सोल्न केलें। घालुनियां घसा अगोळिया हात वात करूं पाहे वळें। कुंथावयाची आवडी बोवा उन्हवनी रडवी बाळें। तुका म्हणे जे जैसे करिती ते पावती तैशींच फळें ॥ ३ ॥

॥ ५४९० ॥ दिन दिन वाढे। आयुष्य नेणवतां गाढें ॥ १ ॥ कैसीं भुललीं बापुडीं। मोहविषयाचे सांकडीं ॥ २ ॥ विसरला मरण। त्याची नाहीं आठवण ॥ ३ ॥ देखत देखत पाही। तुका ह्मणे आठव नाहीं ॥ ४ ॥

॥ ५४९१ ॥ धोंडा दुध प्याला रेडा बोलविला। अंगें फुलें झाला ह्मणुनियां ॥ १ ॥ वारूळाचा झगा लेऊनी बैसला। पाला जो फुटला टोणप्यासी ॥ २ ॥ बाळा तुडउनी चिखल जो केला। बाळ मडकें झाला नवल जेव्हां ॥३॥ फाडोनियां पोट लपविला विठो। येईल चोरटा ह्मणोनियां॥४॥तुका ह्मगे ऐसे मरोनियां गाजी। उरे जगामाजी कीर्ति साची॥५॥

॥ ५४९२ ॥ पालथी घागरी घातलें जीवन। न राहे क्षण वाहुनि जाय ॥ १ पाषाण जिवनीं घातला कल्पवरी। पहतां अंतरीं कोरडाची॥२॥ कचुर तो मुग न येतसे पाका। पाहतां सारिखा दिसतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे उपाय असती सकळां। न चलती खळा वृथा सर्व ॥ ४ ॥

॥ ५४९३ ॥ नामधारकाच्या लोळावें मोरीस। न जावें घरास अभक्तांच्या ॥ १ ॥ नामधारकाचें श्वान व्हावें वोजा। न ध्यावी ते पूजा अभक्तांची ॥ २ ॥ नामधारकाची व्हावी केरसुणी। न व्हावी पट्टराणी अभक्तांची ॥ ३ ॥ तुका ह्मणे भला सत्संगीं उपवास। नको अमृतग्रास अभक्तांचा ॥ ४ ॥

॥ ५४९४ ॥ राजहंस भोक्ता पयाचा निश्चय। वायस तो होय खताहारी ॥ १ ॥ संतांची संगती प्रेमळ धरिती। कुटील ते जाती यमपंथें॥ २॥ पतिव्रते मनीं पती तो ईश्वर। जारिणीचा सार परपुरुष॥३॥ तुका ह्मणे हरी आवडतो भक्तां। विषय अभक्तां माया गोड ॥ ४ ॥

॥ ५४९५ ॥ पुत्र वित्त दारा गृहादि सकळ। देउनी दयाळ वाट पाहे ॥ १ ॥ देवाचे मनांत मज हे ध्यातील। अंतीं पावतील निजपद ॥ २ ॥ सोडुनी देवासी गुंतले दोरासी। झाले अविश्वासी विठ्ठलाचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे फार भुलोनियां मेले। विरळा लागले हरिपायीं ॥ ४ ॥

॥ ५४९६ ॥ पशु पक्षी यांसी नाहीं आत्मज्ञान । काय नारायण जाणताती ॥ १ ॥ नर देह वांटा हरी जाणावया । अधिकार तया दिला देवें ॥ २ ॥ प्राचीनाचे बळें अमृत जो होय । तेचि धरी सोय हरिपायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देहीं चुकलिया हरी । आली तया फेरी चौऱ्याशीची ॥ ४ ॥

॥ ५४९७ ॥ भावाविण माझा विठ्ठल नाकळे । धन विद्या बळें दुरावत ॥ १ ॥ धनवंताकडे न जाय श्रीहरी । धुंडीत भिकारी प्रेमळासी ॥ २ ॥ दीनांसी दयाळ अभक्तांसी काळ । हृद्गत सकळ जाणे हरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे दंभ न चले विठ्ठलीं । बहुत शिणलीं वेद शास्त्रें ॥ ४ ॥

॥ ५४९८ ॥ कोटी करितां साधन । हाता नये नारायण ॥ १ ॥ वेद शास्त्रें पारंगत । जरी झाले मुखोद्गत ॥ २ ॥ रिद्धि सिद्धि अनुकूळ । झाल्या न भेटे गोपाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुरुविणें । आत्मलाभ नाहीं होणें ॥ ४ ॥

॥ ५४९९ ॥ निर्विकल्प हरी अयोध्या विहारी । षड चक्रधारी पांडुरंग ॥ १ ॥ मथुरानिवासी विश्वेश्वर कासी । सांभव कैलासीं पांडुरंग ॥ २ ॥ वैकुंठभूपाळ काळाचाही काळ । तो हा घननीळ पांडुरंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व व्यापी हा विठ्ठल । पहावा सखोल ज्ञानदृष्टी ॥ ४ ॥

॥ ५५०० ॥ बाळा दुध कोण करितो उत्पत्ती । वाढवी श्रीपति स्वयें दोन्ही॥१॥फुटती तरुवर उष्णकाळामाजी । जीवन तयासी कोण घाली॥२॥ काय खाती तया भुजंगांची पिलीं । कोकिळाची केली चिंता कोणी ॥ ३ ॥ कुर्मिणीच्या बाळा नाहीं पयपान । स्वयें नारायण जिववितो ॥ ४ ॥ तुका ह्मणे देव विश्वाचा पाळिता । त्यासी नसे चिंता तुमची कां ॥ ५ ॥

॥ ५५०१॥ स्वयें वरदार प्रपंच मांडीला । मोडुनियां दिला बाळाहातीं ॥१॥ तैसें सर्वाभूतीं असावें संसारीं । प्राचीनाची दोरी साक्ष आहे ॥ २ ॥ वाटसरू वस्ती येऊनी राहिला । प्रातःकाळीं गेला उठोनियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे आम्हा नाहीं प्रापंचीक । पंढरीनायक साह्य झाला ॥ ४ ॥

॥ ५५०२ ॥ झाला कासावीस बाण लागतांचि । गती पारधीची चुकेचिना ॥ १ ॥ चुकेना ते रेखा क्रियमाण जाण । कृष्णाचिये प्राण घेत बाण ॥ २ ॥ बाणें पश्चात्ताप अर्जुनाचे मनीं । शंखचक्रपाणी धरीन मी ॥ ३ ॥ धरूं तुका ह्मणे ऐशियांचा संग । तारूं पांडुरंग उभा असे ॥ ४ ॥

॥ ५५०३ ॥ अधिष्ठानीं जन्म जाहाला जयाचा । जाणावा दैवाचा योगभ्रष्ट ॥ १ ॥ पूर्व जन्मीं कांहीं विक्षेपता झाली । म्हणोनी राहिली आपक्कता ॥ २ ॥ कलियुगीं येतां विठ्ठल पाहिला । पूर्वत्व पावला गुरुद्वारें ॥ ३ ॥ तुका म्हणे झाला समाधी सुयोगीं । निजानंदरंगीं रंगलासे ॥ ४ ॥

॥ ५५०४ ॥ फिरविली पळी पायसांत पूर्ण । राहिली आपण उपवासी ॥ १ ॥ भक्षुनियां गेले इतर सकळ । दर्वीस तें फळ काय होय ॥ २ ॥ तयेपरी भूतां अंतर्बाह्य हरी । असोनी भिकारी न पाहती ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोक्ते हरिदास होती । इतर जल्पती अभिमानें ॥ ४ ॥

॥ ५५०५ ॥ अगस्तीच्या काय तृषे । द्यावें ऐसें उदक ॥ १ ॥ दुर्वासाची निवारी भुक । द्यावे अनेक प्रकार ॥ २ ॥ शनीचिया वेधें पीडा । देतो जोडा कोणता ॥ ३ ॥ तुका ह्मणे हुताशन । शांति मन काशा हें ॥ ४ ॥

॥ ५५०६ ॥ अवघें साधियेलें कर्म । स्नान संध्या नित्य नेम ॥ १ ॥ आश्रमाचे जे जे धर्म । नित्य नित्य जे उपक्रम ॥ २ ॥ क्रिया झाली सांग । गंगोदक दिलें अर्घ्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेम । प्राणासवें सांटीं श्रम ॥ ४ ॥

॥ ५५०७ ॥ येथें काम अनुमानाचें । नाहीं न धरा संकोच ॥ १ ॥ संतपुजा जिवें भावें । देह गेह समर्पावे ॥ २ ॥ जोडी सुकृत व्यापारा । पूजा पावे हरिहरां ॥ २ ॥ संत चरणीं धरा भाव । आणीक नाहीं दुजा देव ॥ ४ ॥ नाना उपचार । सुख पावे विश्वंभर ॥ ५ ॥ तुका ह्मणे निश्चिती । संत भगवंताच्या मूर्ती ॥ ६ ॥

॥ ५५०८ ॥ शुद्ध स्वयंपाक करी । देवापायीं आवड धरी ॥ न पडे संदेह सागरीं । जाणती परी भक्तीसी ॥ १ ॥ जाण तोचि एक विरळा । जाणे तोचि पराची वेळा ॥ देखेल दीनांचा कळवळा । सांगे सकळा सद्बुद्धी ॥ २ ॥ तेंचि जाणावें सोंवळें । शोधी विकल्पाचीं मुळें ॥ नामामृत वांटी फळें । जेणें विटाळें सांडिलें ॥ ३ ॥ तेच जाणे साधुविधी । सावध त्रिकाळ बुद्धि ॥ संदेह भोगाचिया संधी । धरीनें कधीं ठेवीना ॥ ४ ॥ अखंड समाधान ध्यानस्त । कदा चित्त नव्हेचि व्यस्त ॥ सम बुद्धि सदा व्यस्त । नेणें स्वस्त क्रोधासी ॥ ५ ॥ करी करवी परकार्या । अंतर शुद्धीनें

सत्क्रिया ॥ विनया संतजन पाया । भूत दया सर्वांसी ॥ ६ ॥ नाहीं वर्ण ज्ञानाभिमान । सम बुद्धि समसमान ॥ नेणे महत्वी जाणपण । लहानपण मिरवावें ॥ ७ ॥ करणें जीव जयासाठीं । जो नातुडे कवणे संकटीं ॥ तुका ह्मणे तरीच गोष्टी । चित्ता आटी विचेसी ॥ ८ ॥

॥ ५५०९ ॥ निरपेक्षतेपरतें नाहीं सुख । निरपेक्षता-तोचि मोक्ष ॥ पाप पुण्यास हा साक्ष । निरापेक्ष तो एक ॥ १ ॥ निरापेक्ष तोचि ज्ञानी । निरपेक्ष सावध ध्यानी ॥ निरपेक्ष तत्पर भजनीं । या त्रिभुवनीं श्रेष्ठ तो ॥ २ ॥ निरपेक्षा जिवीं शीव । निरपेक्षानें राहे भाव ॥ निरपेक्ष हा स्वयंमेव । आपण देव निजांगें ॥ ३ ॥ निरपेक्ष सर्वां श्रेष्ठ । निरपेक्ष तो कर्मीष्ठ ॥ निरपेक्ष धर्मनिष्ठ । देव उच्छिष्ट इच्छिती ॥४॥ निरपेक्ष ऐसें साधन । नाहीं नाहीं दुजें जाण ॥ निरपेक्ष करा हें मन । तुका चरण वंदितसे ॥ ५ ॥

॥ ५५१० ॥ मन निवे घेतां नाम । रसनीं अमृत परम ॥ होती शकून लाभ प्रेम । बरवें धाम आनंद ॥१॥ मन रंगलें सुरंग । स्थिरावले वृत्तिवेग ॥ पुष्ट सुष्ट झालें अंग । रंगीं रंग मिनले ॥२॥ हर्षे निर्भर झालें चित्त । सदा आनंदें डुल्लत ॥ केली या पंढरीनाथें । कृपा बहुत जाणावी ॥ ३ ॥ दिसे झालेंसे भोजन । येती ढेंकर आनंदानें ॥ इच्छे ठेला चिरा पडोन । धालें पण सर्वदा ॥ ४ ॥ धालेपणाचे उद्गार । मुखा येती-निरंतर ॥ अंग सुखाचे परिचार । हे उपचार नाठवे ॥ ५ ॥ तुका ह्मणे निज सुखा । भेटों आलें आवडे देखा ॥ निधान सांपडे मुखा । कवण लेखा सा भाग्या ॥ ६ ॥

॥ ५५११ ॥ फार खातो सासी ह्मणती ढोरकीं । कुटुंबघातकी राक्षस हा ॥ १ ॥ थोडें खाय अन्न करिती टवाळी । पाप्याचे कपाळीं अन्न कैंचें ॥ २ ॥ ऐसा लोकाचार न राखवे कदा । स्वामी हा गोविंदा कोणेपरी ॥ ३ ॥ तीर्थां जाय सासी ह्मणती कावळा । न करी तयाला निंदिताती ॥ ४ ॥ कथा करितो सासी ह्मणती टाळकुट्या । न करी तो वेठ्या संसारींचा ॥ ५ ॥ तुका ह्मणे सेवा देवाची करिती । तयासी ह्मणती झाला वेडा ॥ ६ ॥

॥ ५५१२ ॥ सत्तासामर्थ्यें जगदानी । चक्रपाणी ऐकतो ॥ १ ॥ तया विसरूं नका कोणी । जे पुराणें वर्णिती ॥ २ ॥ तारी मारी सृष्टिक्रम । पुरुषोत्तम एकला ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळ पाहे । धाक वाहे जयाचा ॥ ४ ॥